महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका, नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर
दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११
Email ID : rdc.palghar-mh@gmail.com

**वाचले :-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
४) मा.मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दि.३०/०९/२०२०.
५) या कार्यालयाचा आदेश क्र.जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/मिशन बिगिन अगेन/आदेश/कावि-१५७४/२० दि.३०/०९/२०२०.
६) मा.सहसंचालक, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.१२७६ दि.०७/१०/२०२०.

क्र.जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/रेस्टॉरंट-बार/आदेश/कावि-१५८१/२० दि.०८/१०/२०२०

जिल्हाधिकारी जिल्हा पालघर

**आदेश :**

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. सदर शासन अधिसूचनेच्या नियम १० नुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये पालघर जिल्हयात (वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्र वगळून) प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) अस्तित्वात असलेल्या व नव्याने प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) अस्तित्वात येतील त्या क्षेत्रात दिनांक ३१/१०/२०२० रोजी मध्यरात्रीपर्यंत लॉकडाऊन चे निर्बंध पूर्वत स्वरुपात चालू ठेवण्यात येत आहेत. प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) च्या बोहरील क्षेत्रासाठी राज्य शासनाने मिशन बिगिन अगेन आदेश दि.३०/०९/२०२० नुसार वाढीव सवलती (Easing of Restrictions and Phase-wise opening of Lockdown) लागू राहतील असे आदेशित केले आहे.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.४ च्या परिशिष्ट क्र.२ मधील मुद्दा क्र.५(i) अन्वये Hotels/ Food Courts/ Restaurants and Bars दिनांक ०५/१०/२०२० पासून ५०% क्षमतेवर सुरु करण्यास परवानगी दिले असून त्याबाबतची SOP पर्यटन विभाग जारी करतील असे निर्देश दिले असल्याने उपोद्घातातील अ.क्र.६ अन्वये COVID-१९ Protocols for Tourism in Maharashtra: Protocols for Restaurants दिनांक ०३/१०/२०२० रोजी निर्गमित केली आहे. त्यानुसार Restaurants (including cafes, canteens, dining halls, F&B units/outlet, within or outside a hotel/resort/clubs) सकाळी ८.०० वाजेपासून ते रात्री १०.०० वाजेपर्यंत उघडे राहतील असे कळवून त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये कोविड-१९ च्या सद्यस्थितीनुसार निर्देश देतील असे नमूद केले असल्याने पालघर जिल्हयामध्ये Restaurants च्या वेळा ठरवून त्याचे पालन करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी, **डॉ माणिक गुरसळ, जिल्हाधिकारी पालघर** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम, २०२० चा नियम १० नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये **पालघर जिल्हयातील (वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्र वगळून) Restaurants**

**(including cafes, canteens, dining halls, F&B units/outlet, within or outside a hotel/resort/clubs) पर्यटन विभागाने निर्गमित केलेल्या SOP नुसार सकाळी ८.०० वाजेपासून ते रात्री १०.०० वाजेपर्यंत उघडे राहतील.**

सदरचा आदेश हे या कार्यालयाच्या पुढील आदेशापर्यंत अंमलात राहतील.

उक्त आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधितांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ५१(b), भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ व साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरहू आदेश आज दिनांक ०८/१०/२०२० रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला आहे.

**सही/-xxx**
(डॉ माणिक गुरसळ)
**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

**प्रत :**

१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.संचालक, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.
४) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.
५) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.
६) अपर जिल्हाधिकारी पालघर मु.जव्हार यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.
७) उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
९) जिल्हा आरोग्य अधिकारी पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१०) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
११) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/ वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१२) गट विकास अधिकारी पं.स. वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/ वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१३) मुख्याधिकारी नगरपरिषद/नगरपंचायत पालघर/डहाणू/जव्हार/तलासरी/विक्रमगड/वाडा/मोखाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१४) जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना माहिती व प्रसिध्दीकरीता.
१५) पालघर जिल्हयातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/महामंडळे/खाजगी आस्थापना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**